पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : ३४ • ऑक्टोबर २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## पुणे महानगरपालिकेत दीपावली निमित्त वसुबारस व दिपोत्सव साजरा





दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१३ रोजी पुणे महापालिकेत वसुबारस व पीएमसी एम्प्लॉईज युनियनतर्फे दिपोत्सव कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

सदर कार्यक्रमाची सुरुवात दिपप्रज्वलनाच्या कार्यक्रमाने झाली. मा. महेश पाठक, महापालिका आयुक्त यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमास मा. राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ईस्टेट), मा. अभिषेक कृष्णा, अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), मा.बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन व इतर महापालिका अधिकारी/कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वसुबारसेनिमित्त मा. सौ. चंचलाताई कोद्रे, महापौर, पुणे यांच्या हस्ते गाय आणि वासरु यांची पूजा करण्यात आली. मा.सौ.माधुरीताई सहस्त्रबुध्दे, सभासद, पुणे मनपा यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. मा. महापौर यांनी वसुबारसेचे महत्व विषद करुन सर्व उपस्थितांना दिपावलीनिमित्त शुभेच्छा दिल्या. सर्व महिलांनी प्रथमच दिप प्रज्वलनाचा कार्यक्रम आयोजित करुन तो उत्स्फूर्तपणे यशस्वी केल्याबद्दल त्यांनी सर्व महिला कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

सदर दिवशी पीएमसी एम्प्लाईज युनियनचे वतीने मनपा भवनाचे हिरवळीवर दिवाळी फराळाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर फराळाचा आस्वाद सर्व उपस्थित महापालिका पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी घेतला.

## पुणे मनपा अभियंता संघातर्फे अभियंता दिन साजरा

भारतरत्न सर एम.विश्वेश्वरैया यांचा जन्मदिवस भारतामध्ये अभियंता दिन म्हणून साजरा केला जातो. पुणे महानगरपालिका अभियंता संघाचे वतीने यावर्षी ७ ऑक्टोबर रोजी अभियंता दिनाचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्थाचे (मेरी) निवृत्त महासंचालक मा.दि.मा.मोरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. मा. महेश पाठक, महापालिका आयुक्त हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. याचबरोबर मा.राजेंद्र जगताप, अतिरिक्त महापालिका आयुक्त (ई), मा.प्रशांत वाघमारे, नगरअभियंता, मा. विवेक खरवडकर, अतिरिक्त नगर अभियंता, मा. प्रमोद निरभवणे, अधिक्षक अभियंता, मा. व्ही.जी.कुलकर्णी, अधिक्षक अभियंता, मा. मधुकांत गरड, उप आयुक्त, मा. विजय दहिभाते, उप आयुक्त, मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन, अभियंता मित्रचे संपादकश्री. कमलकांत वडेलकर, इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी महापालिका सेवेतून निवृत्त झालेले श्री. दत्तात्रय फराटे, श्री. नरेंद्र कुलकर्णी, श्री. प्रविण बोथरे, श्री. धनंजय टिजगे या अभियंत्यांचा सत्कार करण्यात आला. श्री. टिजगे यांनी स्वेच्छा निवृत्ती स्विकारली असून, इतर अभियंते वयोपरत्वे सेवानिवृत्त झाले आहेत.

या वेळी पुणे मनपामध्ये विविध क्षेत्रामध्ये उत्कृष्ट कामगिरी केलेल्या अभियंत्यांना गुणवंत अभियंता पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. यामध्ये श्री. राजेंद्र राउत, श्री.महेंद्र शिंदे, श्री. नंदकुमार खळदकर, श्री. विजय पाटील, श्री.धर्मेंद्र घोणे, श्री. अलबर सुहास, श्री. महानवर शिवाजी, श्री. तावरे संदीप, सौ. संगीता दुर्योधन या अभियंत्यांना गुणवंत अभियंता पुरस्कार प्रदान करण्यात आला. रात्रपाळीचे काम करीत असताना घरामध्ये चोरी झाल्याची घटना घडलेल्या महिला अभियंता सौ. सिमरन पिरजादे यांना विशेष पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले.

संघटनेतर्फे दरवर्षी उत्कृष्ट सांघीक कार्य पुरस्कारही देण्यात येतो. यावर्षी घनकचरा व्यवस्थापन विभागास हा पुरस्कार देण्यात आला. घनकचरा व्यवस्थापन विभागाने घनकचरा व्यवस्थापनामध्ये केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. या वेळी देण्यात आलेल्या स्मृतीचिन्हामध्ये घनकचरा व्यवस्थापन विभागाने केलेल्या कार्याचा उल्लेख करुन या कामी योगदान देणारे मा.सुरेश जगताप, सह महापालिका आयुक्त,मा. संजय गावडे, ज्ञानेश बार्शीकर, रोहिदास गव्हाणे इत्यादी अभियंत्यांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.






या प्रसंगी अभियंत्यांच्या दहावी, बारावी, डिग्री, डिप्लोमा, इत्यादी क्षेत्रामध्ये विशेष नैपुण्य मिळविलेल्या पाल्यांचा सत्कार करण्यात आला. अभियंत्यांनी केवळ तांत्रिक बाबीकडे न पाहता व्यवहारी बाबी म्हणजे बचत करण्याकडेही विचारपूर्वक लक्ष देणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन श्री. मोरे यांनी यावेळी बोलताना केले. श्री. मोरे पुढे म्हणाले की, १०० वर्षांपूर्वी विश्वेश्वरैय्या यांनी शासकीय अधिकारी असताना पिक व्यवस्थेची घडी बसविली होती. यामध्ये शेतीसाठी पाणी पुरवठा करताना एकूण क्षेत्राचे २५% क्षेत्रावरच उस लावणे व इतर क्षेत्रावर कमी पाणी लागणारी पिके घेण्याचे बंधन लावण्यात येत होते. या कायद्याचे काटेकोरपणे पालन त्यावेळी केले जात होते. विश्वेश्वरैय्या यांनी १०० वर्षांपूर्वी दाखविलेली दूरदृष्टी आजच्या काळातही आवश्यक आहे. यावरुन विश्वेश्वरैय्या यांची महानता सिध्द होते असे श्री. मोरे यांनी सांगितले.

मा.महा.आयुक्त यांनी बोलताना मनपातील अभियंत्यांचे कौतुक करुन अभियंत्यांना अत्यंत कठिण परिस्थितीमध्ये काम करावे लागत असल्याचे नमूद केले. अशा परिस्थितीतही अभियंते चांगल्या प्रकारे काम करीत असल्याचे त्यांनी सांगितले. क्षेत्रीय कार्यालयात कार्यरत असणाऱ्या अभियंत्यांवरील ताण कमी करण्याचे दृष्टीने प्रभाग अधिकारी पध्दत रद्द करण्यात आल्याचे मा.आयुक्त यांनी सांगितले.

मा.अति.महा.आयुक्त यांनीही अभियंत्यांच्या कामाचे कौतुक केले. मा.नगर अभियंता व मा. मुक्ता मनोहर यांनीही यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन श्री. सुनिल कदम यांनी केले आभार प्रदर्शन श्री. संजय पोळ यांनी केले.

## संपादकीय...

# खातेनिहाय परीक्षा

पुणे महानगरपालिकेतील लेखनिकी संवर्गामधील ज्युनिअर ग्रेड लेखनिक सेवकांसाठी लोअर डिपार्टमेंटल परीक्षा नेमणूक झाल्यापासून चार वर्ष मुदतीच्या आत उत्तीर्ण होणे तर सिनिअर ग्रेड लेखनिक पदावर पदोन्नतीसाठी हायर डिपार्टमेंटल परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

लेखनिकी संवर्ग हा प्रशासकीय कामकाजातील महत्वाचा भाग आहे. प्रशासकीय सर्व कामकाज हे लेखनिकी संवर्गामार्फत हाताळण्यात येते. कार्यालयीन कामकाजाबाबत निवेदने करणे, तपासणे, टंकलिखित करणे, नियम व अटी नमूद करणे, इत्यादी महत्वपूर्ण कामांमध्ये पुणे महानगरपालिकेचे कायदे, नियम, धोरण, इत्यादीबाबत संबंधित सेवकांना माहिती असणे आवश्यक असते. लेखनिकी संवर्ग जेवढा प्रशिक्षित असेल तितकेच प्रशासनाचे काम अधिक सुकर होते. त्यामुळे महापालिकेतील लेखनिकी संवर्गामध्ये प्रवेश केलेल्या व लेखनिकी संवर्गातील प्रथम पायरी असलेल्या ज्युनिअर ग्रेड लेखनिक संवर्गातील सेवकांसाठी उपरोक्त खातेनिहाय परीक्षा ठरविण्यात आलेल्या आहेत.

सदर खातेनिहाय परीक्षांमध्ये महानगरपालिका अधिनियम, नोटिंग ड्राफ्टिंग व सेवा विनियमांचे ज्ञान संबंधित लेखनिकांना दिले जाते. त्यामुळे महानगरपालिकेची स्थापना, कर्तव्ये व कर्मचाऱ्यांचे वर्तणूक नियम, इत्यादींबाबत इत्त्भूत माहिती सेवकांना होते. तसेच, सदर माहितीच्या आधारावर परीक्षा घेण्यात येत असल्याने लेखनिकांमध्ये अभ्यास करण्याची प्रवृत्ती निर्माण होते व त्यांच्या ज्ञानामध्ये भर पडते. त्याचा फायदा आपोआपच प्रशासकीय कामकाजामध्ये कार्यालयीन काम करताना होत असतो.

लेखनिकी संवर्ग हा पुणे महानगरपालिकेच्या उत्पन्नातील सर्वात मोठा घटक आहे. पुणे महानगरपालिकेतील उत्पन्न गोळा करण्याचे काम लेखनिकी संवर्गामार्फत केले जाते. उदा. कर आकारणी कर संकलन खाते, स्थानिक संस्था कर कार्यालय, उद्यान कार्यालय, बांधकाम विभाग, क्षेत्रीय कार्यालये, गवनि विभाग, चाळ विभाग, आकाशचिन्ह परवाना विभाग, इत्यादी विविध खात्यातील लेखनिकी संवर्गातील सेवक पुणे महानगरपालिकेस महसुल मिळवून देण्यामध्ये कार्यरत असतात. अशा सेवकांना त्यांच्या खात्याबाबत माहिती, त्याबाबतचे नियम, इत्यादी सर्व अभ्यासक्रम हा त्यांचे खातेनिहाय परीक्षांमध्ये समाविष्ट केलेला असल्याने ते अधिक चांगल्या प्रकारेआपले काम बजावू शकतात.

ज्युनिअर ग्रेड लेखनिक संवर्गातून सिनिअर ग्रेड लेखनिक - सरलेखनिक - कार्यालय अधिक्षक - अधिक्षक - विभाग प्रमुख अशा पदसाखळीनुसार पदोन्नतीने नियुक्त्या होत असतात. त्यामुळे प्रत्येक खात्याकडे विभाग प्रमुख हा त्या खात्याकडील प्रशासकीय कामकाज करीत असतो. त्यामुळे लेखनिकी संवर्गातील प्रथम पायरी असलेल्या ज्युनिअर ग्रेड लेखनिक संवर्ग सक्षम करणेसाठी खातेनिहाय परीक्षा घेणे आवश्यक ठरतात.

खातेनिहाय परीक्षांचा दुसरा उपयोग म्हणजे लेखनिकी संवर्गातील प्रत्येक सेवकाला त्याच्या वैयक्तिक उन्नतीसाठी या माहितीचा मोठ्या प्रमाणावर फायदा होतो. खातेनिहाय परीक्षांमुळे कायदे, नियम, वेतन, रजा, पेन्शन, वेतनातील कपाती, वर्तणूक नियमइत्यादीबाबत माहिती होत असल्याने सेवक वैयक्तिक नुकसान टाळू शकतात व शासकीय योजनांचा लाभ योग्य रित्या उपभोगू शकतात. तसेच, त्यांचेवर होणाऱ्या अन्यायाविरुध्द देखील योग्य प्राधिकाऱ्याकडे न्याय मागू शकतात. त्यामुळे प्रत्येक लेखनिकाने खातेनिहाय परीक्षा उत्तीर्ण होणे हे प्रशासनाच्या व त्याच्या स्वत:च्या फायद्याचे ठरते. लेखनिकी संवर्गातील बऱ्याच सेवकांनी अधिनियम व नियमांच्या माहितीच्या आधारे वर्ग २, वर्ग १ व खातेप्रमुख पदांपर्यंत नियुक्त्या मिळविलेल्या आहेत.

याउलट जे सेवक खातेनिहाय परीक्षा उत्तीर्ण होत नाहीत त्यांची प्रगती तर होत नाही परंतु त्यांचे नंतर मनपा सेवेत रुजू झालेले सेवक त्यांच्या अगोदर पदोन्नती घेवून त्यांचेच साहेब होतात. त्यामुळे उत्तीर्ण न होणाऱ्या सेवकांचे न भरुन येणारे आर्थिक नुकसान होते.

लेखनिकी संवर्गातील प्रत्येक सेवकाने लोअर व हायर डिपार्टमेंटल परीक्षा उत्तीर्ण केल्यास त्याचा फायदा त्यांना स्वत:ला व पर्यायाने महानगरपालिकेला होणार आहे. यास्तव खातेनिहाय परीक्षा ही किती महत्वाची व फलद्रुप आहे याची प्रचिती येते.

# ओळख गुणवंताची

ओळख गुणवंताची यामध्ये आपण श्री. रमेश अनंता जाधव, बिगारी, बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्री. रमेश अनंता जाधव यांचे वडिल पुणे महानगरपालिकेमध्ये आरोग्य खात्यात बिगारी म्हणून कामास होते. घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे श्री. जाधव यांना लहानपणापासूनच म्हणजे इयत्ता पाचवीपासूनच माळी काम, झाडाला पाणी घालणे ही कामे करावी लागली. इयत्ता दहावीनंतरही आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने त्यांना पूर्ण वेळ काम करावे लागले. त्यामुळे टिळक महाराष्ट्र मुक्त विद्यापीठामधून एस.वाय.बी.ए. पर्यंत शिक्षण त्यांनी घेतले. दिनांक ११ ऑगस्ट २००६ रोजी श्री. जाधव यांची पुणे महानगरपालिका सेवेत बिगारी पदावर नियुक्ती झाली.

श्री.जाधव यांना शालेय जीवनापासूनच सामाजिक कामाची आवड होती. मार्च १९९७ मध्ये पुणे मनपा नागरवस्तीमार्फत पुणे साक्षरता अभियानाची सुरुवात झाली. या अभियानामध्ये स्वयंसेवक म्हणून सक्रिय सहभाग घेवून साक्षरता वर्ग सुरु केला. या साक्षरता वर्गाला साधारणत: १०-१२ निरक्षर महिला येवू लागल्या. सदर वर्गाचे कामकाज पाहून नागरवस्ती विकास विभागाने श्री. जाधव यांना सन १९९८ मध्ये औद्योगिक वसाहतीमध्ये चालू असणाऱ्या सर्व साक्षरता वर्गांचे समन्वयक म्हणून जबाबदारी सोपविली. या वर्गाबरोबरच शाळेतील विद्यार्थ्यांनी घरातील किंवा शेजारील एका निरक्षरास साक्षर करणे म्हणजेच इच वन टिच वन या नवीन संकल्पनेच्या माध्यमातून या भागातील १०३८ निरक्षरांना साक्षर करण्याचा प्रयत्न केला. तथापि, या कार्यक्रमांतर्गत कुटुंबामध्ये शिकविण्यासाठी बराचसा कालावधी जात असल्याने अभ्यासास वेळ मिळत नसल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी केली. वास्तविक सदर विद्यार्थी वस्तीत राहात असल्याने अभ्यास करण्यासाठी त्यांनाही अनुकुल परिस्थिती नव्हती. या प्रतिकुल परिस्थितीतून दि.४ जून १९९८ रोजी श्री संत नामदेव शाळेमध्ये या मुलांकरिता रोज सायंकाळी ६.३० ते ९.३० मोफत अभ्यासिका व संस्कार वर्गाची स्थापना श्री. जाधव यांनी केली. विशेष म्हणजे या वर्गाची सुरुवात जेष्ठ विचारवंत श्री.ग.प्र.प्रधान व तत्कालीन मा. सह महा.आयुक्त श्री. अ.वि.कळमकर यांच्या उपस्थितीत झाली.

मुलांच्या अभ्यासाबरोबर व्यक्तिमत्व विकास व्हावा यासाठी गेली १५ वर्षांपासून सतत स्पर्धा, तज्ञ व्यक्तिंची व्याख्याने, सहली, सात दिवसांचे विशेष उन्हाळी निवासी शिबीरे मु.पो.जांभली, सांगरुन,



**श्री. रमेश जाधव**
**बिबवेवाडी क्षेत्रीय कार्यालय**

पानशेत, माणगाव, भोर, बालवडी, शिंद, पोतनिसांचे वडगाव, इत्यादी ठिकाणी घेवून विद्यार्थ्यांसाठी व गावकऱ्यांसाठी व्यसनमुक्ती, साक्षरता, अंधश्रध्दा निर्मूलन, इत्यादी विषयांवर प्रबोधनात्मक कार्यक्रम श्री. जाधव यांनी घेतले.

पानशेत व मुळशीमधील ४५ खेड्यांमध्ये विद्यार्थ्यांसह सायकल फेरीद्वारे व्यसनमुक्ती, अंधश्रध्दा या विषयावर पथनाट्याच्या माध्यमातून त्यांनी प्रबोधनाचे काम केले आहे. अभ्यास वर्गाच्या माध्यमातून १२ जानेवारी रोजी युवादिन व स्वामी विवेकानंद जयंतीच्या निमित्ताने प्रतिकुल परिस्थितीतून यशस्वी झालेल्या व्यक्तींचा सत्कार करण्यात येतो. मे महिन्याच्या सुट्टीत विशेष उन्हाळी व्यक्तिमत्व विकास निवासी शिबीराचे आयोजन एका खेड्यात करण्यात येते. ४ जून रोजी वर्गाच्या वर्धापन दिनानिमित्त मोफत शैक्षणिक वस्तूंचे गरजूंना वाटप करण्यात येते. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिना निमित्त भव्य रॅलीचे आयोजन करण्यात येते. ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त शिक्षक पुरस्कार वितरित करण्यात येतात. १४ नोव्हेंबर बालदिनानिमित्त परिसरातील ११ शाळांमधील १००० विद्यार्थ्यांसाठी खुली चित्रकला स्पर्धा घेण्यात येते. याशिवाय होळी सणानिमित्त गुटखा, दारु, तुंबाखू, सिगारेटची होळी वस्तीमध्ये करण्यात येते. यानिमित्ताने मुक्तांगण व्यसनमुक्ती केंद्र व आनंदवन व्यसनमुक्ती केंद्राशी श्री. जाधव यांचे जवळचे नाते जुळले आहे. श्री. जाधव यांच्या वर्गाला आजपर्यंत मा. बाबासाहेब पुरंदरे, मा. ग.प्र.प्रधान, मा. नवलगुंदकर, मा. अनलि अवचट तसेच पुणे मनपाचे मा. आयुक्त, मा. महापौर, विविध महाविद्यालयातील प्राचार्य यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

गेली १५ वर्षे चालू असणाऱ्या श्री. जाधव यांच्या या उपक्रमास मा. अ.वि.कळमकर, तत्कालीन सह महापालिका आयुक्त, मा. भाउसाहेब जाधव, प्राचार्य, मराठवाडा कॉलेज, रोटरी क्लब पूना डाउन टाउन, महापालिका अधिकारी, मा.सभासद व विशेष म्हणजे ज्यांच्याकडे इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण घेत असतानाच माळी काम केले अशा श्रीमती शारदाताई कुलकर्णी यांचे त्यांना विशेष मार्गदर्शन मिळाले आहे. या सर्वांचे श्री. जाधव शतशः ऋणी आहेत.

श्री. जाधव यांच्या कार्याची दखल घेवून त्यांना विविध सन्मान व पुरस्कारांनी गौरविण्यात आले आहे. सन २००३ मध्ये पुणे मनपातर्फे सन्मान, सन २००३ मध्येच श्रीमंत योगी प्रतिष्ठानतर्फे सत्कार, सन २००४ मध्ये भोई प्रतिष्ठानतर्फे सन्मान, सन २०१० मध्ये आनंदवन व्यसनमुक्ती केंद्राच्या वतीने युवा अस्मिता पुरस्कार, सन २०१२ मध्ये पुणे महानगरपालिका कामगार कल्याण निधीतर्फे गुणवंत कामगार पुरस्कार, सन २०१३ मध्ये पुणे मनपा आणि लोकशाहीर अण्णाभाउ साठे उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने श्री. जाधव यांचा सन्मान करण्यात आला आहे.

श्री. जाधव यांचे सामाजिक कार्य अविरत चालत राहणार असून, त्यांच्या भविष्यकालीन काही योजना आहेत. झोपडपट्टीतील गरीब व गरजू मुलांसाठी स्वतंत्र अभ्यासिका व संस्कार वर्ग पुणे महानगरपालिकेच्या सहकार्याने बांधण्याचा मानस आहे. तसेच, मुक्तांगण व आनंदवन व्यसनमुक्ती केंद्राच्या मदतीने पुणे महानगरपालिकेतील आरोग्य कोठ्यांवरील सेवकांसाठी खास व्यसनमुक्ती अभियान राबविण्याची त्यांची संकल्पना आहे.

तुला होवो वान स्मरण मम माते परिमणी
स्मृती माझ्या संगे तव मी नेईन जनी,
तुझी थोरवी पटवून देईन सदामुखी,
तव आशीर्वादाने मिळतील
मला आंतरी सुखे,

या उक्तीप्रमाणे शैक्षणिक क्षेत्रातील समाजकार्य अखंडपणे चालू ठेवण्याचे व्रत श्री. जाधव यांनी घेतले आहे.

श्री. जाधव यांच्या भविष्यकालीन वाटचालीस कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## प्रश्नपत्रिका नमुना – सन २०११-१२
## महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम

### लोअर डिपार्टमेंटल परीक्षा (गुण १००)

प्रश्न क्र. १ खालील विधाने चूक की बरोबर ते सकारण लिहा. (गुण २०)

१. महापालिका आयुक्त यांनी खातेप्रमुखांना स्वत:चे अधिकार प्रदान केले.
२. जी संविदा अधिनियमाच्या तरतुदी व नियमास अनुसरुन केली नसेल अशी कोणतीही संविदा महानगरपालिकेस बंधनकारक असले.
३. मनपाची कोणतीही स्थावर मालमत्ता महापालिका आयुक्त यांचे अधिकारात विक्री करुन देता येईल.
४. ज्या जागेचे वापरासाठी लायसेन्स दिले आहे, त्या जागेत आयुक्तांना दिवसा व रात्री कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल व तिची पहाणी करता येईल.
५. कलम २४५ नुसार कोणत्याही इमारतीच्या खिडकीच्या आत प्रदर्शित जाहिरातीस जाहिरातीचे नियमन व नियंत्रण लागू होते.
६. शासनाने महानगरपालिकेकडे हस्तांतर केलेली कोणतीही मालमत्ता समुचित शासनाच्या पूर्व परवानगीशिवाय हस्तांतराच्या शर्तीविरुध्द अशा कोणत्याही रितीने पट्ट्याने देता विकता किंवा हस्तांतरीत करता येणार नाही.
७. आयुक्तांच्या रजेच्या काळात किंवा त्यांचे पद तात्पुरते रिकामे झाले असेल त्या काळात आयुक्त म्हणून काम करण्यासाठी राज्य शासनास एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल.
८. स्विकृत सभासदाने महापौर पदासाठी अर्ज दाखल केला.
९. महापौर पदावरील नियुक्ती तीन वर्षाचे काळासाठी असते.
१०. सार्वत्रिक निवडणुकानंतर आपल्या पहिल्या सभेत महापौर स्थायी समितीचे सदस्यांची नेमणूक करतात.

प्रश्न क्र. २ (अ) व्याख्या लिहा (कोणत्याही पाच) (गुण १०)

१. घनफळ २. सार्वजनिक जागा ३. जकात ४. महापालिका आयुक्त ५. मिळकत कर ६. जमीन ७. करयोग्य मूल्य

प्रश्न क्र. २ (ब) खालील बाबींशी संबंधित महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम क्रमांक नमूद करा. (गुण ५)

१. अधिकारांचा वापर करणे हे महानगरपालिकेने आवश्यक खर्चास मंजुरी देण्याच्या अधीन असणे
२. महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचेवर शास्ती लावणे
३. महानगरपालिकेच्या विशेष समित्या
४. स्थायी समितीची रचना
५. अधिनियमाची अंमलबजावणी करण्याचे काम सोपविण्यात आलेले नगरपालिका प्राधिकारी
६. शहर अभियंता व वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांची कर्तव्ये.

प्रश्न क्र. २ (क) रिकाम्या जागा भरा. (गुण ५)

१. महानगरपालिकेचे स्थायी समितीचे दरवर्षी ----- सदस्य निवृत्त होतात.
२. महानगरपालिकेच्या महापौर पदासाठी ----- इतका पदावधी आहे
३. महानगरपालिकेच्या सदस्याने आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा ----- कडे सादर करणे आवश्यक आहे.
४. महानगरपालिका सेवाकास निवासस्थान देणे व निवासस्थानातून काढून टाकणेसाठी कलम ---- मध्ये तरतूद करणेत आली आहे.
५. महानगरपालिका आयुक्तांना स्वत:चे अधिकारात रक्कम रु. --- पर्यंत संविदा करण्याचे अधिकार आहेत.

प्रश्न क्र. ३ (अ) टिपा लिहा. (कोणतेही दोन) (गुण १०)

१. संविदा करणेचा अधिकार व पध्दत
२. मनपा कर्मचारी व अधिकारी यांचेवर लादावयाची शास्ती (प्रकार व कार्यपध्दती)
३. मनपाच्या स्थावर मालमत्तेचा विनियोग

प्रश्न क्र. ३ (ब) खालील वाक्य समर्थनाने किंवा विरोधात कारणांसह स्पष्ट करा. (कोणतेही दोन) (गुण १०)

१. महानगरपालिका सभेने आयुक्त व निवड समिती यांनी शिफारस केलेल्या उमेदवाराऐवजी अन्य उमेदवाराची आस्थापनेवर नियुक्तीस मान्यता दिली.
२. स्थायी समितीने आयुक्तांनी शिफारस केलेल्या निविदाधारकाऐवजी अन्य निविदाधारकाची संविदा करणेचा निर्णय घेतला.
३. आयुक्तांचे गैरहजेरीत कार्यरत प्रभारी आयुक्तांनी आयुक्तांचे सर्व अधिकार वापरुन कामकाज केले.

प्रश्न क्र. ४ (अ) खालील अधिकाऱ्यांची कर्तव्ये व अधिकार सांगा. (गुण १०)

१. नगर सचिव २. शहर अभियंता ३. उप आयुक्त ४. मुख्य लेखापरीक्षक

प्रश्न क्र. ४ (ब) सविस्तर माहिती लिहा (गुण १०)

१. महानगरपालिकेचे अंदाजपत्रक तयार करण्याची पध्दत
२. स्थायी समितीची रचना व तिची सदस्य निवडीची कार्यपध्दती
३. इमारत बांधण्याच्या उद्देशाची आयुक्त यांना द्यावयाच्या नोटीशीबाबत माहिती

प्रश्न क्र. ५ (अ) महानगरपालिकेची आवश्यक व ऐच्छिक कर्तव्ये लिहा किंवा लायसन्स व लेखी परवानगी देणे, निलंबित करणे किंवा रद्द करणे आणि फी इत्यादी बसविणे यासंबंधी अधिनियमातील सर्वसाधारण तरतुदी लिहा. (गुण १०)

प्रश्न क्र.५ (ब) अधिनियमातील तरतुदीन्वये महानगरपालिकेने बसवायचे कर व वसुल करण्याची रीत स्पष्ट करा किंवा महानगरपालिका आयुक्तांची नेमणूक, वेतन, अनुपस्थित रजा देणे व हंगामी आयुक्ताची नेमणूक याबद्दल अधिनियमातील तरतुदी स्पष्ट करा. (गुण १०)

### हाअर डिपार्टमेंटल परीक्षा (गुण ४०)

प्रश्न क्र. १ खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे द्या. (गुण २०)

१. महानगरपालिका अधिनियमातील कलम ४ नुसार वेगवेगळी प्राधिकरण कोणती
२. महानगरपालिकेची सदस्य संख्या निश्चितीसाठी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम ५ मधील तरतुदी स्पष्ट करा.
३. मागील वर्षातील अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकातील अखर्चित रकमांबाबत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियमातील कलम १०२ मधील तरतुदी स्प्ट करा.
४. महापौर, उपमहापौर आणिमहानगरपालिका सदस्यांनी राजीनामा देण्याची रित स्पष्ट करा.
५. महानगरपालिकेस निर्देश देणे, माहिती मागविणे आणि निर्णय निलंबित अथवा विखंडित करणे याबाबतच्या कलम ४४८ ते ४५१ मधील तरतुदी स्पष्ट करा.
६. महानगरपालिकेच्या कामकाजासाठी महानगरपालिकेने व शासनाने करावयाच्या नियमाबाबतच्या कलम ४५५ व ४५६ मधील तरतुदी स्पष्ट करा.

प्रश्न क्र. २ टिपा लिहा. (कोणतेही दोन) (गुण १०)

१. नोटीस बजावण्याची कार्यपध्दती
२. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ आणि इतर अधिनियमातील महानगरपालिका आयुक्तांचे अधिकार कनिष्ठ अधिकाऱ्यांना प्रदान करणेबाबतचे कलम ६८ व ६९ मधील कार्यपध्दती
३. महानगरपालिकेच्या भाडेपट्ट्याच्या मिळकतीतून भोगवटादारास काढून टाकण्याची कार्यपध्दती

प्रश्न क्र. ३ महानगरपालिका संविदाबाबत कार्यपध्दती आणि आयुक्त व स्थायी समितीचे त्याबाबतचे अधिकार स्पष्ट करा. यामध्ये काही बदल अथवा सुधारणा आवश्यक आहे अगर याबाबत आपले मत स्पष्ट करा.
किंवा
महानगरपालिकेसाठी आस्थापना सूची मंजुर करणे, त्यात विविध महानगरपालिका प्राधिकारणच्या मान्यता घेणे, शासनाची मान्यता घेणे व मंजुर पदावर निवड करण्याची पध्दत स्पष्ट करा.सध्याच्या अधिनियमातील तरतुदीनुसार असलेली निवड समितीची रचना स्पष्ट करुन यांत काही बदल आवश्यक आहेत किंवा कसे याबाबत आपले मत स्पष्ट करा. (गुण १०)

---

## मन

माझ्या मना माझ्या मना जाणूनी घे तु खाणा खुणा.
तुझे न कोणी मालक, तु तर आहेस अज्ञात चालक
रुप नसे तुझे कोणा ठाउक... न दाखवता येईल तुझे प्रारुप.
पण सावली स्वरुप तु असतोस मज समिप.
गर्द काळोखात तु जणू दिशादर्शकाच्या भूमिकेत.
दोलायमान अवस्थेत माझ्या.. तुज कौलच ठरतो नामी.
संवादाविना आपुल्या एकही क्षण नाही.
निद्रेत देखील तु स्वप्नरुपात बोलू पाही.
एकमेकांत आपुली सखोल गुंतागुंत
त्यामुळेच आपले सर्व जुळते तंतोतंत.
मी न तुझा शब्दाबाहेर.. तु न माझ्या देहाबाहेर.
अखेरच्या श्वासापर्यंत साथ आपुली राहील निरंतर...

**उर्मिला फडतरे**
**अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज) कार्यालय**

## हसा

साहेब कर्मचाऱ्यास : तुम्ही खुशाल ऑफिसमध्ये झोपता. हे काय तुम्हाला तुमचे घर वाटते ?
कर्मचारी : नाही साहेब. घरी एवढी शांतता कुठे मिळते.

❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖

साहेब कर्मचाऱ्यास : तुम्हाला एम.एस.ऑफिस माहित आहे काय ?
कर्मचारी : नाही साहेब. पण पत्ता दिलात तर मी नक्की शोधून काढीन

❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖❖

---

## कामगार प्रशिक्षण वर्गात
## गरजेनुरुप व सतत प्रशिक्षण योजनेंतर्गत व्याख्याने

दि.२३/९/१३ रोजी सुरु झालेल्या कामगार प्रशिक्षण वर्ग क्र. ८५ व ८६ मध्ये पुढील व्याख्यात्यांनी विविध विषयांवर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन केले.श्री.विजय कांबळे- भारताची राज्यघटना, डॉ.पंडित सोनकांबळे-वैद्यकीय सहाय्य योजना, श्रीमती उषा आल्हाट- सामाजिक अपप्रवृत्ती, श्री.चंद्रकांत गमरे- कुटुंबाचे अंदाजपत्रक, श्री.रामटेके-कामगार विषयक कायदे, श्री.गोडबोले-सकारात्मक दृष्टिकोन, श्री. प्रशांत एडवी -संवाद कौशल्य, श्री. संजय मोरे-जनता संपर्क महत्व, श्री. सुनिल गिलबिले -आपत्कालीन नियोजन, श्री.तावरे-ग्राहक हित, श्री.प्रकाश हुरकुडली-पाणीपुरवठा, श्री.मधुकर बिबवे-केंद्र राज्य सरकार कल्याणकारी योजना, श्री.रामटेके- पेन्शन कायदा, श्री.प्रशांत एडवी - संवादकौशल्य, श्री.लीलाधर वाबळे-संगणक काल आज उद्या, श्री.ज्ञानेश्वर मोळक-कार्यनिती, श्री.धनाजी खामकर-गैरहजेरी, श्री.नितीन केंजळे-कामगार कल्याण योजना, श्री.मधुकर बिबवे-दृष्टिकोन/भूमिका, श्री.इसाक शेख-शिक्षा दंड व प्रकार, श्री.विजय कांबळे-व्यसनाधिनता, सौ.तनुजा रावळ-ताणाचे नियोजन, श्री.गणेश सोनवणे-आपत्ती निवारण, श्री.वेल्हाळ/श्री.रासकर- अंधश्रध्दा निर्मूलन, सौ.तनुजा रावळ-यशाची पाच सूत्रे, श्री.चंद्रसेन जगताप-औद्योगिक कलह कायदा १९४७, श्री.नितीन केंजळे-सभाधीटपणा, श्री.धनाजी खामकर-आदर्श सेवक कसा असावा.

# माहे ऑक्टोबर, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३१/१०/१३ रोजी कै. वडके हॉल येथे ऑक्टोबर, १३ मधील सेवानिवृत्त २६ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता.



यामध्ये १७ वयपरत्वे व ९ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला. प्रमुख पाहुणे म्हणून मा.श्री हेंमत निकम, कर आकारणी कर संकलन प्रमुख व मा. विजय दहिभाते, उप आयुक्त (वि.का.क्र.१) हे उपस्थित होते. तसेच, मा.तुकाराम जगताप, सचिव, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, श्री.बाबा शेख, सेवानिवृत्त संघाचे प्रतिनिधी, मा. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी हे उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे मा. श्री. निकम यांनी सर्व सेवकांनी केलेल्या सेवेबद्दल सर्वांचे आभार मानले. प्रत्येकाची सेवा त्याच्या पदानुसार तेवढीच मोलाची असते. प्रत्येक सेवकाशिवाय महापालिका आपले काम यशस्वीरित्या करु शकणार नाही, तसेच प्रत्येक सेवकाच्या सेवेचे मोल हे महत्वाचे आहे. महापालिकेकडून सर्व सेवानिवृत्त सेवकांचा सन्मान केला जातो, ही खरच कौतुकास्पद बाब आहे. असे नमूद करुन सर्व सेवानिवृत्त सेवकांनी त्यांच्या भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. तसेच, मा. दहिभाते यांनी देखील उपस्थित सर्व कर्मचाऱ्यांना पुढील आयुष्यासाठी मार्गदर्शन करुन शुभेच्छा दिल्या.

तदनंतर सेवानिवृत्त होणारे सेवक श्रीमती दहिभाते व श्री.तावरे यांनी सेवानिवृत्तीप्रित्यर्थ आपले मनोगत व्यक्त केले व सेवेतील अनुभव सांगितले.

त्यानंतर सेवानिवृत्तांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ.अलका जोशी व आभार प्रदर्शन श्री.नितीन केंजळे यांनी केले. कार्यक्रमाचे आयोजनामध्ये श्री.शिंदे, श्री.मरकड व श्री.सुभाष कांबळे यांनी विशेष परिश्रम घेतले.


**कल्याणवार्ता**

ऑक्टोबर, २०१३

प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका

❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)

❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी

❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले

❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.

❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५

या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.

❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार)
कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५१/
१२५३/१२५५
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


## मी

ध्यानात मग्न होतो मी
स्वयं शोधत होतो मी
अस्त्रशस्त्रांनी देह छेदिले तरीही
स्तब्ध होतो मी
रक्ताळलेल्या रक्त जलांनी
भिजत नव्हतो मी
ना जळत होतो चितेतल्या
प्रेताप्रमाणे मी
रणभूमीवर उठलेल्या वादळवाऱ्यांनी
सुकतही नव्हतो मी
देह भरजरी वस्त्र बदलतो
भरजरी वस्त्रातला देह बदलतो मी
आदि नाही अंत नाही असा
सनातन शाश्वत अन् चिरंतन मी
अणुरेणू अवघे ब्रम्हांड
व्यापिले मी
आत्मा परमात्मा अन् विश्वात्मा मी

**श्री. सुनिल जगन्नाथ हनवते**
**श्रीमती सावित्रीबाई फुले प्रशाला**

# २ ऑक्टोबर - महात्मा गांधी जयंती

२ ऑक्टोबर गांधी जयंती. जगाला सत्याग्रहाबरोबर अहिंसेचे तत्वज्ञान शिकवणाऱ्या गांधींचा जन्मदिवस. हा दिवस आंतरराष्ट्रीय अहिंसा दिन म्हणून साजरा केला जातो. महात्मा गांधींचा जन्म २ ऑक्टोबर १८६१ साली गुजरातमधील पोरबंदर शहरात झाला. गांधीजींच्या वडिलांचे नाव करमचंद तर आईचे नाव पुतळाबाई होते. वयाच्या तेराव्या वर्षी गांधीजींचा कस्तुरबा माखनवाला यांचेशी बालविवाह झाला. शालेय शिक्षण संपवून वयाच्या १९ व्या वर्षी १९८८ मध्ये गांधीजी वकिलीचे शिक्षण घेण्यासाठी इंग्लंडला गेले. गांधीजी व कस्तुरबा यांना चार मुले झाली. हरीलाल, मणिलाल, रामदास व देवदास. महात्मा या संस्कृत शब्दाचा अर्थ आहे महान आत्मा. लोक गांधीजींना बापूजी म्हणत.

१९४४ साली नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी गांधीजींना राष्ट्रपिता संबोधले. अहिंसेच्या तत्वावर आधारित सत्याग्रहाचा उपयोग गांधीजींनी सर्वप्रथम दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना नागरी हक्क मिळवून देण्यासाठी केला. त्यानंतर १९१५ मध्ये भारतात परतल्यानंतर त्यानी चंपारण मधील शेतकऱ्यांना जुलमी कर आणि जमिनदार यांच्याविरोधात एकत्र करुन लढा दिला. त्यानंतर गांधीजींनी दांडी यात्रा, भारत छोडो चळवळ अशा सत्य आणि अहिंसा या तत्वांचा नुसताच पुरस्कार केला नाही तर ते स्वतःच ती तत्वं जगले. स्वदेशीचा आग्रह धरत त्यांनी ब्रिटिश कपड्यांना विरोध केला आणि खादीचा पुरस्कार केला. गांधीजी चरख्यावर स्वतः सूत कातत. ३० जानेवारी १९४८ साली गांधीजींची हत्या करण्यात आली. दिल्लीच्या बिर्ला भवनाच्या बागेतून फिरत असताना नथुराम गोडसे या युवकाने गांधीजींवर गोळ्या झाडल्या आणि एका युगपुरुषाचा अंत झाला. गांधीजींच्या राज घाट येथील समाधीवर हे राम हे शब्द लिहिलेले होते. अनेकांच्या मते त्यांचे हे अखेरचे शब्द होते. अशा या महान व्यक्तीचा जागतिक स्तरावर सन्मान आणि आदर व्यक्त करण्यासाठी गांधी जयंती हा दिवस साजरा करण्यात येतो.

**गांधीजींची वचने**

❖देवाला कोणताच धर्म नसतो.
❖कोणालाही जिंकायचे असेल तर प्रेमाने जिंका
❖धीर म्हणजे स्वतःचीच परीक्षा पहाणे.
❖जग बदलायचे असेल तर आधी स्वतःला बदलवा.

## दसरा

अश्विन शुध्द दशमी हा दिवस विजयादशमी किंवा दसरा म्हणून साजरा केला जातो. देवीच्या घटांची स्थापना अश्विन शुध्द प्रतिपदेला केल्यानंतर नउ दिवस नवरात्रोत्सव आणि दहाव्या दिवशी विजयादशमी साजरा करण्यात येतो.

दसरा शब्द दश म्हणजे दहा यावरुन आला असावा. त्याचा अर्थ दहावा दिवस असा आहे.

दसरा हा प्रारंभी एक कृषीविषयक लोकोत्सव होता. पावसाळ्यात पेरलेले पहिले पीक घरात आल्यानंतर शेतकरी हा उत्सव साजरा करत. नवरात्रात घटस्थापनेच्या दिवशी घटाखाली नउ धान्यांची पेरणी करतात व दसऱ्याच्या दिवशी त्या धान्यांचे वाढलेले अंकुर उपटून देवाला वाहतात. कित्येक ठिकाणी शेतातल्या भाताच्या लोंब्या तोडून आणून त्या प्रवेशद्वारावर तोरणासारख्या बांधतात. ही प्रथादेखील या सणाचे कृषीविषयक स्वरुप व्यक्त करते. पुढे याच सणाला धार्मिक स्वरुप दिले गेले आणि इतिहासकाळात तो एक राजकीय स्वरुपाचा सण ठरला.

दसऱ्याच्या दिवशी देवीने महिषासुराचा वध केला. भगवान रामचंद्राने रावणावर मात करण्यासाठी ह्याच दिवशी प्रस्थान केले. ह्याच दिवशी रामाचा पूर्वज रघुराजाला घाबरुन कुबेराने शमी वृक्षावर सोन्याच्या मोहरांचा पाउस पाडला.

वनवास संपल्यावर पांडवांनी वृक्षाच्या ढोलीत ठेवून दिलेली शस्त्रास्त्रे पुन्हा धारण केली. त्यामुळे या दिवशी शस्त्रास्त्रांची पूजा केली जाते तर व्यावसायिक लोक आपापल्या कामाची हत्यारे, यंत्रसामग्री यांची पूजा करतात. या दिवशी संध्याकाळी गावाबाहेर सीमोल्लंघनास जातात. तेथे आपट्याच्या झाडांची पूजा करुन सुवर्णमोहरांचे प्रतिक म्हणून आपट्याची पाने एकमेकांस दिली जातात.

श्रीरामाने या दिवशी रावणाबरोबर युध्द करण्यासाठी दक्षिणेस कूच केले. त्याला यशही मिळाले. त्याचा विजयाबद्दल आनंदोत्सव म्हणून हा सण साजरा केला जातो. राजपूत सरदारही याच मुहुर्तावर लढाईवर निघत असत. मराठ्यांच्या स्वाऱ्याही याच दिवसांपासून सुरु होत. पेशवे आपल्या आश्रित संस्थानिकास दसऱ्याच्या दिवशी दरबार भरवून मानाचा पोशाख देत. ब्रिटिश अधिकाऱ्यांनीही काही काळ ही प्रथा सुरु ठेवली होती.

दसरा शेतकऱ्यांच्या दृष्टीनेही महत्वाचा आहे. कारण नवरात्रात नउ दिवस उगवलेली रोपे शेवटच्या दिवशी दसऱ्यास वाहतात. तसेच शेतकरीही शेतात तयार झालेल्या भाताच्या लोंब्या आणून त्याची पूजा करतात. प्रवेशद्वारावरही टांगतात. याशिवाय घरातील विविध भांड्यांना धान्याची कणसे बांधण्याची प्रथा कोकणात आहे. बंगालमध्येही अशाच प्रकारचा एक विधी होतो. तेथे स्त्रिया गवताची पेंढी धान्याच्या कोठारास बांधतात. त्याला बावन्न पोटी असे म्हणतात. म्हणजे हे धान्य बावन्न पट होउ दे.

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने धान्याला व ते पिकवणाऱ्या शेतकऱ्याला मोठा मान आहे. धान्य उदंड प्रमाणात यावे यासाठी ईश्वराला साकडे घालण्यात येते. या धान्याच्या रक्षणासाठी पूर्वीच्या काळी राजा व प्रजा झटत असे. कारण धान्य असले तर जगता येईल. अन्यथा नाही. हे त्यांना माहित होते. म्हणून धान्याला सोन्याची उपमा दिली जात असे. वर्षाकाल संपताच राजा प्रजाजनांबरोबर गावाच्या सीमेपर्यंत जावून नवीन धान्य घरात आणत असे. अशाप्रकारे दसरा हा सण साजरा करण्यामागे इतिहास आहे.

## हे सावित्री

हे सावित्री, तु किती सोसिल्या यातना ।
यश आले परी तुझ्या अथक प्रयत्नांना ।
स्त्री शिकली, उच्च शिक्षितही झाली ।
विविध क्षेत्रात पदार्पण करु लागली ।
स्त्री नाही अबला, स्त्री आहे सबला ।
उपभोग्य वस्तू नाही हा होतो गलबला ।
पुरुषांचा दृष्टिकोन खरंच का हो बदलला ?
कित्येक कळ्या आज गर्भातच मारिती ।
कित्येक तरुणी, बालिका अत्याचाराला बळी पडती ।
शारिरीक, मानसिक अत्याचाराची नसे गणती ।
याचसाठी सावित्रीने का हो केला अट्टहास ?
का होतो तिच्या त्यागाचा आज उपहास ।
स्त्रियांच्या पुनर्बांधणीसाठी वेचिलेस जीवन ।
जोतिरावासमवेत स्त्रिअस्मितेसाठी जीवन केलेस समर्पण ।
आज परी स्त्री ह्याच समाजात आहे का सुरक्षित ?
तिला बसवले कायद्याने जरी आरक्षणाच्या चौकटीत ।
घराबाहेर पडलेली मुलगी, युवती घरी न ये ।
पुरुषी अत्याचाराचा बळी केंव्हा, कुठे, कधी सांगता न ये ।
याचे समाधान वाटते का आज तुला थोडे तरी ?
असतेस आज तू तर कष्टली असतीस बहू अंतरी ।
न संपली स्त्रियांची आजही अवहेलना ।
किती होते आजही तिची विवंचना ।
कित्येक पुरुषी वासनेच्या बळी ठरती ।
कित्येक जणी यास्तव जीवन संपविती ।
जिजाउ, सावित्री, इंदिरा, अहिल्या
विशेष दिनी यांना मानवंदना कितीही वाहिल्या ।
जोवरी अत्याचार न संपे तिजवरचा ।
काय उपयोग या फुक्या श्रध्दांजलीचा ?

**सौ. अलका जोशी**
**सल्लागार (कामगार) कार्यालय**

## रोहिणीची पाठवणी

आहे त्यांचा स्वभाव मिळून मिसळून वागण्याचा
सुखाबरोबर दुःखातही सर्वांना साथ देण्याचा
कुरळ्या केसांची त्यांनी कधी घातली नाही वेणी
छान छान साडया आणि अपटूडेट रहाणी
विवाहाने आयुष्याची सुंदर सुरुवात झाली होती
पण नियतीची खेळी कोणाला माहित नव्हती
जोडीदाराची साथ अल्पायुषी ठरली
मुलांची जबाबदारी खांद्यावर पेलली
कष्ट केले अपार, त्यांना नव्हता अंत
नोकरी करावी लागली कारण आयुष्याची होती भ्रांत
सुनांवर केले प्रेम, नात आहे आवडती
जोडली आहेत त्यांनी आयुष्यातील नाती
नोकरी करताना अनेक चढउतार आले
पुणे अर्बन बँकेचे उपाध्यक्षपदही भूषविले
आपुलकीने सहकार्य केले मनपा सेवकांना
त्यामुळे हे पद मिळाले दोन वर्षे त्यांना
बत्तीस वर्षे सेवा केली पुणे महानगरपालिकेची
आता होईल सुरुवात त्यांच्या स्वच्छंदी जीवनाची
भारतभर फिरुन त्यांना देशाटनही करायचे आहे
जमल्यास सहलींचे आयोजकही व्हायचे आहे
उत्तरोत्तर मिळो असेच यश त्यांना
पूर्ण होवोत त्यांच्या सर्व मनोकामना
निवृत्तीची वेळ येता दुःख होते मना
रोहिणीताई सुखी राहील, हीच ईश्वरचरणी प्रार्थना

**श्रीमती सुलभा चोपडे**
**आकाशचिन्ह परवाना विभाग**